# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
# ग्राहक तक्रार निवारण मंच
# कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर

MAHADISCOM
Maharashtra State Electricity Distribution Co. Ltd.

सं.क्र.काअ/ग्रातनिमं/कोप/ १५/२०१४-१५/२४४ दिनांक : २६.११.२०१४

**आदेश केस क्र.१५/१४-१५**

मे.मयुरा स्टीलस् प्रा.लि., .. अर्जदार
शिये बावडा रोड,एम.आय.डी.सी.,
शिरोली, जि.कोल्हापूर.

**विरुध्द**

कार्यकारी अभियंता (का) तथा नोडल ऑफीसर, .. विरुध्द पक्षकार
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,
मंडल कार्यालय, कोल्हापूर.

**कोरमः-** १. श्री.बी.जी.पवार,अध्यक्ष
२. श्री.जी.बी.पानकर, सदस्य सचिव
३. श्री.जी.सी.लेले,सदस्य

**महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग**
**(ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल)**
**विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार**

**न्याय निर्णय**

श्री.बी.जी.पवार, अध्यक्ष, ग्रा.त.नि.मंच. कोल्हापूर, खालीलप्रमाणे न्याय निर्णय देत आहेत.

मे.मयुरा स्टीलस् प्रा.लि., हे वितरण कंपनीचे उच्च दाब औद्योगिक ग्राहक आहेत. त्यांचा ग्राहक क्र.२५१५९९००६७७० असा आहे. मंजुर भार ९०० KW/ HP प्रत्यक्ष जोडभार ९०० KW/ HP करार मागणी ७०० KVA आहे. ग्राहकाने आपले authorised signatory श्री.चंद्रशेखर शंकर डोली यांचेमार्फत आपले प्रतिनिधी श्री.प्रताप होगाडे व जावेद मोमीन यांच्यामार्फत दि.२९.०५.२०१४ रोजी अनुसुची 'अ' मध्ये मंचाकडे वितरण कंपनीचे अधीक्षक अभियंता, कोल्हापूर, यांचेविरुध्द CGRF Regulation 2006 नुसार गा-हाणे दाखल केले.

तक्रारदाराच्या म्हणण्यानुसार आपल्या उद्योगाच्या जागेमध्ये (in the premises) औद्योगिक कारणासाठी विजेचा वापर करीत आहोत. त्याचा पत्ता सर्व्हे नं. ५२५,५२६,५२८,५२९,५३० असा आहे. ३० एप्रिल,२०१२ व फेब्रुवारी,२०१३ पासून वितरण कंपनीकडून ग्राहकावर अनाधिकृत वापर केला या स्वरुपाचा आरोप व तपासणी केली जाते. अधीक्षक अभियंता तथा असेसिंग ऑफिसर यांनी दि.१५.१०.२०१३ रोजी ॲनेक्श्चर K2 मध्ये ग्राहकास वीज कायदा २००३ कलम १२६ अंतर्गत फायलन ॲसेसमेंट ऑर्डर बजावली. त्यासोबत दि.१५.०३.२०१३ चे रु.४१,७८,५९२/- इतक्या रकमेचे फायनल बिल दिले आहे. सदरची रक्कम दि.२४.१०.२०१३ अखेर भरावी असे कळविले. ग्राहकाच्या म्हणण्यानुसार सदरची असेसमेंट व सदरची आकारणी संपूर्णपणे बेकायदेशीर व नियमबाह्य आहे. कोणत्याही स्वरुपाचा अनाधिकृत वापर केलेला नाही. केलेली कारवाई नियमबाह्य सदरचा आदेश व आकारणी रद्द करण्यात यावी अशी प्रमुख मागणी या तक्रारीत केली आहे. आपल्या म्हणण्याच्या पृष्ट्यर्थ तक्रारीतील पॅरा ५ क्लॉज ब पान ३ वर घडलेल्या घटनांचा तपशील (choronological sequence and actions) दिला आहे.

त्यानुसार तक्रारदाराच्या म्हणण्यानुसार दि.१९.०३.२०१३ रोजी स्थळ पाहणी झाली नाही. त्यांची सही त्या अहवालावर घेण्यायत आली नाही. त्यादिवशी अथवा कोणत्या ही तपासणीस अधीक्षक अभियंता स्वतः आले नाहीत. स्थळ पाहणी तपास अहवाल कोल्हापूर ऑफीसने तयार करुन आमची दि.१५.१०.२०१३ रोजी सही घेतली आहे. प्रोव्हीजनल असेसमेंट दि.१०.०५.२०१३ रोजी मिळाला. प्रत्यक्ष सुनावणी दि.१०.०४.२०१३ रोजी झाली. मात्र फायनल बिलात वेगळीच म्हणजे दि.१५.०३.२०१३ ही तारीख आहे. आपल्या म्हणण्याच्या पृष्ट्यर्थ मा.विद्युत लोकपाल, मुंबई यांचे रिप्रेझेंटेशन क्र.७१/२०१३ दि.१.१०.२०१३ चा संदर्भ घेतला आहे. वीज वापर अनाधिकृत नाही या म्हणण्याच्या पृष्ट्यर्थ ग्राहकाचे मालकीच्या व कब्ज्यात असलेल्या सर्व गट नं. एकूण ५ याची एकत्रित सनद मा.जिल्हाधिकारी, कोल्हापूर, यांनी दि.९.५.२००८ रोजी दिलेली आहे. सदर मिळकतीस एकच कंपाऊंड वॉल आहे. या मिळकतीचे (premises) चे आत फर्म व्यतिरिक्त अन्य कोणता उद्योग नाही. औद्योगिक वापराव्यतिरिक्त अन्य कोणताही वापर नाही. फर्मचा पहिला विद्युत पुरवठा ५२० केव्हीए चा जोडणी दिनांक ६.३.२००६ असा आहे. ग्राहकाने ५२६ चा ग्रामपंचायतीचा परवाना दि.३०.६.२००४ व गट क्र.५२५ चा दि.२७.९.२००५ सालाचा आहे असे सांगितले. दोन्ही गटाचा एकत्रित बांधकाम पूर्णत्वाचा दाखला दि.१३.४.२००६ चा आहे. वीजजोडणीमधील वाढीसाठी अर्जात नोंद गट क्र.५२६ असाच आहे. कार्यकारी अभियंता यांनी सदर वाढ मागणी अहवाल देतांना दोन्ही गट क्रमांकाची नोंद करावी अशी टिप्पणी दि.१९.३.२०१० रोजी केली आहे. दि.१८.५.२०१० रोजी पत्रासोबत गट क्रमांकाच्या नोंदीसह सुधारित नकाशा देऊन पुर्तता केली आहे. ग्राहकाच्या म्हणण्यानुसार केवळ पहिल्या वीजजोडणी मागणीच्या अर्जावर गट क्र.५२६ व्यतिरिक्त अन्य गट नं. ची नोंद नाही. यावरुन कलम १२६ चा वितरण कंपनी गैरवापर करीत आहे. आपल्या म्हणण्याच्या पृष्ट्यर्थ व्यापारी परिपत्रक क्र.४६ शासकीय अधिसुचनानुसार वितरण कंपनीने अधिसुचना सर्व कार्यालयांना दिल्या आहेत. महाराष्ट्र जमीन महसुल संहिता १९६६ (Revenue Code) मधील कलम ४२ ते ४४ अन्वये बिगर शेती आदेश व सनद या समान बाबी आहेत. म्हणून सनद ही final legal document आहे.

यापूर्वी ग्राहकाने मंचाकडे किरकोळ अर्ज १/२०१३-१४ अंतरिम आदेशासाठी तक्रार दाखल केली. त्यात दि.२८.११.२०१३ रोजी अंतरिम स्थगिती आदेश दिले आहेत. याविरुध्द कंपनीने आपले म्हणणे उच्च न्यायालय,मुंबई, येथे रिट पिटिशन क्र.(L) १३३१/२०१४ अन्वये दाखल केले आहे. तक्रार मंजुर करावी. दि.१५.१०.२०१३ ची फायलन ॲसेसमेंट ऑर्डर व सोबत दिलेले फायनल बील रु.४१,७८,५९२/- पूर्णपणे रद्द करण्यात यावे. मानसिक व आर्थिक छळवणूक करणा-या संबंधितअधिका-यांवर दंडात्मक व शिक्षात्मक कारवाई व्हावी व ग्राहकास किमान झालेल्या खर्चापोटी रु.१०,०००/- भरपाई मिळावी.

वितरण कंपनीस दि.०९.६.०१४ च्या नोटीस पाठवून दि.२४.०६.२०१४ पूर्वी लेखी अहवाल देण्यास कळविले. वितरण कंपनीने दि.१०.०७.२०१४ रोजी आपले लेखी म्हणणे दाखल केले. त्यानुसार ग्राहकास विद्युत पुरवठा औद्योगिक कारणासाठी त्यांच्या गट क्र.५२६ मु.पो.टोप,ता.हातकणंगले, येथे दि.६.३.२००६ रोजी वितरीत करण्यात आला. ग्राहकाने मंजुर केलेल्या premises व्यतिरिक्त इतर अनाधिकृत वीजवापर सुरु केल्याने त्यांचेविरुध्द कलम १२६ प्रमाणे कारवाई सुरु केली. ग्राहकाने He has not applied & got the sanction for the use of electricity in the areas in which he was found to be extended the electricity. ग्राहकाने वीज कायदा कलम २००३ नुसार Appellant Authority म्हणजे Chief Electrical Engineer, PWD, Mumbai कडे अपील करणे आवश्यक होते. ग्राहकाने त्यासाठी ५०% final assessment amount भरणे गरजेचे होते. ग्राहकाने Regulation 6.8 of the CGRF Regulation 2006 चा संदर्भ घेऊन या मंचास १२६ वीज कायदा २००३ मधील कलमानुसार कंपनीस सुनावणी घेण्याचा अधिकार नाही असे para 4 मध्ये म्हटले आहे. कारण Regulation 6.8 नुसार, “ **if the Forum prima-facie of the viewthat any Grievance referred to it falls within purview of any of the following provisions of the Act, same shall be excluded from the jurisdiction of the Forum”.** वितरण कंपनीने अंतरिमआदेशाविरुध्द मुंबई उच्च न्यायालयात फोरमला अधिकार नसल्याचे अपील केले आहे. त्याचा क्र.२२७७/२०१४ आहे. त्याची दि.५.८.२०१४ रोजी सुनावणी आहे. त्या कारणावरुन ग्राहकाचे अपील मंचासमोर चालू शकत नाही. (maintainable) नाही. Regulation 6.7 CGRF Regulation २००६ नुसार अपील चालू शकत नाही. ते फेटाळण्यात यावे. ग्राहकाने मा.विद्युत लोकपाल यांचे Representation 71 of 2013 मधील आदेशाचा संदर्भ घेतला. त्याबाबत वितरण कंपनीने सदरच्या आदेशाविरुध्द मा.उच्च न्यायालयात आव्हान दिले आहे. त्यामध्ये पुढील तारीख २८.०७.२०१४ आहे. दि.१३.२.२०१४ रोजी मा.उच्च न्यायालयाने M/s.Galaxy Auto Axle Case No.71 of 2013 मधील Respondent यांना पुढील सुचना दिल्या आहेत.

**“to seek instructions from his client within 1 week as to whether it want to approach appellate authority under section 127 or not, else the impugned order will simply quashed and set aside.”**

या सर्व कारणासाठी ग्राहकाचे अपील फेटाळण्यात यावे.

प्रस्तुत तक्रारीची सुनावणी दि.१६.७.२०१४ रोजी घेण्यात आली. ग्राहकाचे प्रतिनिधी श्री.होगाडे व वितरण कंपनीचे अधिकारी श्री.कुमठेकर, अधीक्षक अभियंता, श्री.आरळी व श्री.आहुजा उपस्थित होते.

श्री.होगाडे, ग्राहक प्रतिनिधी यांनी तक्रारीत सांगितल्याप्रमाणे सर्व घटनांचा सविस्तर उल्लेख करुन ग्राहकाची तक्रार तुमच्यासमोर चालू शकते. वितरण कंपनीच्या म्हणण्यात तथ्य नाही. त्यासाठी मा.विद्युत लोकपाल यांचा Representation 71 of 2013 या आदेशाचा संदर्भ घेतला आहे. त्याप्रमाणे उच्च न्यायालयात दि.२८.७.२०१४ रोजी सुनावणी आहे. तसेच तक्रारदाराच्या बाजुनेही अंतरीम आदेशाविरुध्द वितरण कंपनीच्या अपीलाची सुनावणी दि.५.८.२०१४ रोजी आहे.

मा.उच्च न्यायालयाच्या आदेशास अधीन राहून उभय बाजुचे संमतीने तक्रारीची सुनावणी घेण्यात आली . श्री.होगाडे यांनी मा.लोकपाल Representation 71 of 2013 मधील आदेशाचा पॅरा ११ चा संदर्भ घेऊन मंचास असे अधिकार आहेत व मंचाच्या या अधिकारातील सुचनेनुसार व आदेशानुसार अशा तक्रारीची सुनावणी घेऊन निकालात काढावी असे निरीक्षण केले आहे. तसेच त्या आदेशातील सप्लाय कोड २००६ अट नं.२४ बाबतचे निरीक्षण मा.विद्युत लोकपाल यांनी केले. ते सर्क्युलर महाराष्ट्र शासनाचे आहे. त्याचा उल्लेख वितरण कंपनीच्या कर्मशिअल सर्क्युलर क्र.२०० दि.५.७.२०१३ मध्ये आहे. त्यातील पुढील Guidelines नुसार वितरण कंपनीने Log Book दाखल केली नाही. स्थळ पाहणी अहवाल हजर केला नाही. फक्त ॲनेक्श्चर K2 नुसार final assessment आदेश दिले आहेत. त्यामधील बिलातील तारखामध्ये तफावत आहे. तसेच वीज कायदा १२६ सबसेक्शन ३ नुसार ३० दिवसात final आदेश Order of Assessment दिले नाही. त्यामुळे वितरण कंपनीच्या अधिका-यांनी केलेल्या कारवाईमुळे Violation of Rule & Regulation होते. दि.१९.३.२०१३ ला स्थळ पाहणी केली नाही. ग्राहकाची दि.१५.१०.२०१३ रोजी सही घेतली आहे. तसे ग्राहकाने शपथपत्र दिले आहे. श्री.होगाडे यांनी दोन्ही Assessment Order मधील कालावधी भिन्न असून एकात १२ महिन्यांचा व एकात ४४ महिन्यांचा दाखविला आहे. या सर्व कारणांवरुन वितरण कंपनीची कलम १२६ नुसार केलेली कारवाई null and void ठरते. श्री.होगाडे यांनी कलम १२६ सबसेक्शन ६ clause B मधील ३ Unauthorised use of Electricity या मथळयाखाली दिलेल्या पहिल्या I ते IV मध्ये वितरण कंपनीची केस येत नाही. V, for the premises other than those for which the supply of electricity was authorised.

मुळ वीजपुरवठा दि. ६.३.२००६ रोजी सुरु झालाआहे.वीजपुरवठ्याचे ठिकाण गट नं.५२६ दाखवले असले तरी मा.कलेक्टरसाहेब,कोल्हापूर,यांनी मंजुर केलेली सनद दि.५.२.२००८ ची आहे.वाढीव भार घेतांना २ सर्व्हे नं.चा उल्लेख केला आहे. सेक्शन ४२ व ४४ ए नुसार Land Revenue Code 66 नुसार बिगर शेती परवानामुळे हे सर्व जमिनीचा एकच भुखंड झाला आहे. त्यामुळे हा एकच premise ग्राह्य धरण्यात आले आहे असे समजावे. सेक्शन २ सबक्लॉझ ५१ E मधील दिलेल्या premises ची व्याख्या याचा संदर्भ घेतला आहे. ३३ KV Line connection मंजुर झालेआहे. T/C एकच आहे. मीटर एकच आहे. या सर्व कारणांवरुन premises एकच आहे व वीजवापर अनाधिकृत जागेवर होत नाही. त्यामुळे वितरण कंपनीची कारवाई १२६ खाली येत नाही. CGRF Regulation Clause A नुसार ही तक्रार मंचाच्या अधिकारक्षेत्रातून exclude होत नाही. त्यामुळे मंचास तक्रार चालविण्याचा अधिकार आहे.

याउलट श्री.कुमठेकर,अधीक्षक अभियंता, कोल्हापूर,यांनी ग्राहकास १२७ खाली अपील करण्यास सांगावे कारण मंचास अशी तक्रार चालविण्याचा अधिकार नाही. मंचाने दि.२३.११.२०१३ रोजी दिलेले आदेशाविरुध्द मा.उच्च न्यायालयात आव्हान दिले आहे. तसेच यापूर्वी मंचाने वितरण कंपनीस मनाई करतांना कुठली रक्कम भरण्याचे आदेश दिले नाहीत. ते आदेश renew करुन ती रक्कम भरण्यास सांगावे. मा.विद्युत लोकपाल, मुंबई यांचे दि.१.१०.२०१३ चे केस क्र.७१/२०१३ मधील आदेश मा. लोकपाल मंचास असे निर्देश देऊ शकत नाही. ग्राहकाने स्वतःच्या फायद्यासाठी शपथपत्र दिले आहे. सुनावणीदरम्यान नैसर्गिक न्यायतत्वानुसार सर्व कागद दिले व संधी दिली. ग्राहकाने आता कथन केलेप्रमाणे केव्हा ही premises असे declare केले नव्हते. ग्राहकाने सनद वितरण कंपनीकडे दिली नाही. ग्राहकाने क्लॉज V सबसेक्शन ६ कलम १२६ वीज कायदा २००३ नुसार जादा एरिया जादा premise मध्ये वीजवापर करु शकत नाही. श्री.कुमठेकर, अधी.अभियंता, यांनी तक्रार चालविण्यास मंचास अधिकार आहे असे finding दिल्यास वितरण कंपनीस अधिक म्हणणे देण्यास संधी द्यावी. केलेली कारवाई योग्य व कायदेशीर असून तक्रार/अपील फेटाळण्यात यावे. आज दि.१७.७.२०१४ रोजी श्री.होगाडे यांनी मा.वीज नियामक आयोगाचे केस क्र.५६ / २०१४ दि.१५.७.२०१४ चे M/s.Galaxy Auto Axel Pvt.Ltd. मधील मा.विद्युत लोकपाल यांचे दि.१.१०.२०१३ चे Representation No.71 of 2013 मधील आदेशाची त्वरित अंमलबजावणी करावी असे दिलेल्या आदेशाची प्रत पाठवली आहे. त्याची माहिती वितरण कंपनीस देण्यात यावी.

खालील मुद्दा न्यायनिर्णयासाठी मंचाकडे उपस्थित होतो.

**मुद्दा क्र.१:** मे.मयुरा स्टीलस् प्रा.लि. या ग्राहकाची तक्रार मंचाच्या अधिकारक्षेत्रात येते काय ?

**उत्तर :** होय

**मुद्दा क्र.२:** ग्राहकाने मागणी केल्याप्रमाणे दि.१५.१०.१३ ची final assessment order व यासोबतचे final bill रु.४१,७८,५९२/- रद्द करण्याची मागणी मंजुर करणे योग्य होईल काय ?

**उत्तर :** होय

वितरण कंपनीच्या अधिका-यांनी मंचासमोर व लेखी अहवालात मागणी केल्याप्रमाणे मंचाच्या अधिकारक्षेत्राचा मुद्दाच्या आक्षेपाबद्दल प्रथम निर्णय घेणे आवश्यक आहे असे मंचाचे मत आहे. यापूर्वी या मंचाचे या ग्राहकाचा पूर्वीचा किरकोळ अर्ज क्र.१ याच मागणीबद्दल दि.२८.११.२०१३ रोजी अंतरीम आदेश देतांना अशी तक्रार मंचासमोर चालू शकते असा निर्णय दिला आहे. त्याविरुध्द वितरण कंपनीने मा.उच्च न्यायालयात आव्हान दिले आहे. या कारणामुळे लेखी अहवालात CGRF Regulation २००६ Rule ६.७ नुसार ही तक्रार किंवा अपील चालु शकत नाही. ती फेटाळण्यात यावी. अशी हरकत घेतली आहे. CGRF Regulation २००६ Rule ६.७ Clause (d) Where a representation by the consumer, in respect of the same Grievance, is pending in any proceedings before any court, tribunal or arbitrator or any other authority, or a decree or award or a final order has already been passed by any such court, tribunal, arbitrator or authority.

अशा परिस्थितीत अशी तक्रार मंचासमोर चालु शकत नाही. याठिकाणी वितरण कंपनीने मंचाच्या अंतरिम आदेशाविरुध्द मा.उच्च न्यायालयामध्ये याचिका दाखल केली आहे. ग्राहकाचे कंपनीसोडून कुठल्याही इतर कोर्टात या विषयासंबंधी वाद नाहीत. यामुळे Rule ६.७ याठिकाणी लागु होऊ शकत नाही. वितरण कंपनीचे आक्षेप या कारणावरुन फेटाळण्यात येत आहे.

मा.विद्युत लोकपाल यांचे केस क्र. ७१/२०१३ च्या लेखी Representation (निवेदन) बाबत मा.उच्च न्यायालयात सदरचे प्रकरण pending आहे. सुनावणी दि.२८.०७.२०१४ ऐवजी ६.०८.२०१४ रोजी ठेवण्यात आली आहे असे कंपनीकडून मंचास सदस्य सचिवांमार्फत तोंडी कळविण्यात आले.

वर उल्लेख केल्याप्रमाणे सुनावणीनंतर श्री.होगाडे यांनी केस क्र.५६/२०१४ मा.वीज नियामक आयोगासमोर दि.१३.७.२०१४ रोजी झालेल्या आदेशाची प्रत हजर केली. त्यावरुन वितरण कंपनीने मा.लोकपाल यांचे केस क्र.७१/२०१३ मधील दि.१०.१०.२०१३ चे आदेश त्वरित अंमलात आणायचे आदेश दिले आहेत. यावरुन मा.लोकपाल यांचा केस क्र.७१/२०१३ मधील आदेश वीज नियामक आयोगाने योग्य व कायदेशीर असे मान्य करुन अंमलबजावणी करण्याच्या सुचना दिल्या आहेत. यावरुन असे अनुमान काढता येईल की मा.लोकपाल यांच्या दि.१०.१०.२०१३ च्या आदेशानुसार केस क्र.७१/२०१३ मधील ग्राहकाची तक्रार मंचासमोर चालू शकते.

Electricity Act २००३ मधील सेक्शन १८१ तील तरतुदीनुसार मा.कमिशनना असे अधिनियम करण्याचे अधिकार आहेत. Sub-Section १ नुसार The State Commissions may, by notification, make regulations consistent with this Act and the rules generally to carry out the provisions of this Act.

त्यामुळे मा.वीज नियामक आयोगाने CGRF Regulation २००६ मंजुर केले आहे व ते Official Gazzate मध्ये प्रसिध्द झाल्यापासून अंमलात आहेत. हे अधिनियम Rule 1.4 नुसार -

These Regulations shall be construed harmoniously with the standards of performance of Distribution Licensees and the Electricity Supply Code specified by the Commission under the provisions of clauses (x) and (za) of sub-section (२) of section 181 of the Act. In case of any inconsistency with these Regulations, the standard of performance of Distribution Licensees and the Electricity Supply Code shall prevail.

यावरुन हे स्पष्ट होते की मा.वीज नियामक आयोगाने मंजुर केलेल्या standard of performance व Electricity Supply Code 2005 याला अधिन राहून वितरण कंपनी ग्राहकाला विद्युतपुरवठा करु शकते व त्या मोबदल्यात मा. वीज नियामक आयोगाने मंजूर केलेल्या दराने (Tariff) बिलाची रक्कम वसुल करु शकते.

या ठिकाणी मंचाचे अधिकारक्षेत्राबाहेर तक्रार आहे असे मंचाचे प्रथमदर्शनी मत झाल्यास CGRF Regulation ६.८ नुसार चालू शकत नाही. त्यासाठी Clause A Unauthorized use of Electricity under १२६ of the Act ही बाब तपासावी लागेल. वितरण कंपनीचा मुख्य आक्षेप म्हणजेच ग्राहकाचा हा विद्युतपुरवठा गट क्र.५२६ मध्येच घेतलेला आहे.

हे खरे की सुरवातीच्या पत्रव्यवहाराप्रमाणे ग्राहकाची वीजोडणी गट क्र.५२६ मध्ये दिसते. परंतु गट क्र.५२५,५२८,५२९ व ५३० हे ग्राहकाच्या मालकीचे आहेत. त्याची सनद आहे. वीजजोडणी दि.६.३.२००६ रोजीची आहे. त्यापूर्वी गट क्र.५२५ चा परवाना आहे. ग्राहकाने जेव्हा वाढीव वीजमागणीचा अर्ज केला त्यामध्ये गट क्र.५२६ चा उल्लेख आहे. वितरण कंपनीच्या अधिका-यांनी दि.१९.०३.२०१० च्या टिप्पणीमध्ये दोन्ही गटाची नोंद करुन नकाशा जोडला आहे. त्या अहवालातील Clause No.१ नुसार १०० KVA Transformer Centre is to be shifted which is in the same premises असे निरीक्षणआहे. यावरुन ग्राहकाने घेतलेला विद्युतपुरवठा निश्‍चिंतपणे गट क्र.५२६ मध्येच नसून ग्राहकाच्या इतर मालिकीची जमीन गट क्र.मध्ये घेतलेला आहे. ग्राहकाने हजर केलेले दि.१०.२.२०११ व १८.३.२०११ नुसार जिल्हा औद्योगिक केंद्रातील नोंदणी व प्रदुषण नियंत्रण मंडळाचा दाखला मिळवला. त्यात गट क्र.५२५ ची नोंद आहे. यामुळे वितरण कंपनीचे म्हणण्याप्रमाणे गट क्र.५२६ हाच declared premises आहे व त्यासाठी वीजपुरवठा घेतला आहे असे म्हटले आहे. वितरण कंपनीच्या मार्केट यार्ड उपविभागाचे उपकार्यकारी अभियंता यांनी आपल्या दि.५.२.२०१३ च्या पत्रात All the Gat Nos. are adjacent to each other and presently they are merged. No specific physical boundary is defined at the site.

यावरुन ग्राहकाने विद्युतपुरवठा इतर ठिकाणी घेतला असे म्हणता येणार नाही व तो अनाधिकृत वीजवापर होत नाही असे अनुमान काढण्यात येत आहे. त्याचप्रमाणे CGRF Regulation २००६ मधील Rule ६.८ व त्यातील Clause A नुसार Unauthorised use of Electricity as provided under १२६ of Electricity Act होणार नाही.

यावरुन मंचाचे असे मत झाले आहे की ही तक्रार मंचासमोर चालू शकते. त्यामुळे मुद्दा क्र.१ चे उत्तर **होकारार्थी** देण्यात येते.

वितरण कंपनीने आपल्या लेखी अहवालात अधीक्षक अभियंता यांनी मागणी केलेप्रमाणे तक्रार मंचासमोर चालू शकते असे मत झाल्याने कंपनीस अधिक लेखी खुलासा करण्यास संधी देण्यात येत आहे. ग्राहक आपले त्यावर प्रतिउत्तर relejoinda देऊ शकतो.

२१ ऑगस्टच्या मंचाच्या आदेशानुसार वितरण कंपनीने दि.२८.०८.२०१४ रोजी अतिरिक्त म्हणणे दाखल केले. त्यामध्ये याच तक्रारदाराचे पूर्वीचा अर्ज क्र. १ मधील मंचाचे दि.२३.११.२०१३ च्या अंतरिम आदेशाला आव्हान दिलेली याचिका क्र. २२७७/२०१४ दि. १०.११.२०१४ ला मा. उच्च न्यायालय, मुंबई सुनावणीसाठी आहे. तसेच कलम १४५ विद्युत पुरवठा कायदा २००३ व ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल विनियम २००६ चे कलम ६.८ चा संदर्भ घेऊन परत मंचाच्या अधिकारक्षेत्राबाबत हरकत घेतली आहे. वि.प.ने मा. गुजरात उच्च न्यायालयाच्या डे.इंजिनिअर वि. रमेश, केस क्र. १०५९९/२०१० मधील दि. १४.११.२०११ च्या आदेशाचा संदर्भ दिला आहे. मा. लोकपाल यांच्या मे. गॅलक्सी ॲटो ॲक्सल या केसमधील आदेशाविरुध्द दाखल याचिकामध्ये मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी स्थगिती दिली आहे असे नमूद केले आहे.

तक्रादार यांनी यास वेगळे लेखी प्रत्यूत्तर (Rejoinder) दिले नाही, परंतु इतर तक्रारीचे सुनावणीवेळी श्री. होगाडे यांनी वि.प.चे श्री. आरळी, सहाय्यक अभियंता यांचे समक्ष ही तहकुबी तात्पुरती आहे, कायमस्वरुपी नाही असे सांगितले. मंचाने मुद्दा क्र. १ चे उत्तर ' होय ' तक्रार मंचापुढे चालू शकते, असे दिले आहे. त्या अनुषंगाने इतर घटनाबाबत सांगण्यास मागितल्याप्रमाणे वि.प.ला मुदत दिली ,त्याबद्दल कुठेही पूर्वीच्या म्हणण्याचा ऊहापोह केला नाही.

त्यामुळे रिट पिटीशन २२७७/२०१४ मधील सुनावणी दि. १०.११.२०१४ रोजी ठेवण्यात आली आहे. मधल्या काळात ग्राहक प्रतिनिधी श्री. होगाडे यांनी तक्रारदार ग्राहकाचे व वि.प.चे अधीक्षक अभियंता यांच्याशी तडजोडीबद्दल चर्चा / बोलणी चालू आहे म्हणून जवळजवळ दोन महिने मुदत दिली, परंतु कुठलाही तडजोडीचा प्रस्ताव मंचासमोर दिला नाही. त्यामुळे मुद्दा क्र. २ चे स्वतंत्ररित्या finding देण्यात येत आहे.

वि.प.चे कार्यकारी अभियंता यांनी Section १२६ Sub Section ६ Clause b(V)

" For the premises or areas other than those for which the supply of electricity was authorized " असा वापर असेल तर अनधिकृत वीज वापर होतो, त्यामुळे सेक्शन १२६ च्या अंतर्गत असेसमेंट व भरपाईच्या रकमेचीही चौकशी करुन आदेश देता येईल असे सांगितले. या ठिकाणी ग्राहकाचे कनेक्शन गट नं. ५२६ मध्ये दि. ०६.०३.२००६ रोजी सुरु झाले आहे. गट क्र. ५२५ व ५२६ या मधील ग्राम पंचायत बांधकाम परवाना नुसार जून २००४ व सप्टेंबर २००५ एकत्रित दि. १२.०४.२००६ रोजी मिळाले. विद्युत जोडणी वाढ अर्जात नोंद गट क्र. ५२६ अशी आहे. वि.प.चे कार्यकारी अभियंता यांनी सदर वाढ मागणी अर्जाचा अहवाल देतांना दोन्ही गट नंबर एकत्रित करावे असे दि. १९.०३.२०१० ला कळविले. त्यानुसार ग्राहकाने दि. १८.०५.२०१० रोजी पत्र देऊन दोन्ही गटाच्या नोंदीसह सुधारीत नकाशा देवून पूर्तता केली आहे. तसेच दि. १०.०२.२०११ च्या जिल्हा उद्योग केंद्राचे नोंदणीत व दि. १८.०३.२०११ चे प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या दाखल्यात गट क्र. ५२५ ची नोंद आहे. यावरुन ग्राहकाने विद्युत पुरवठा आपल्या गट क्र. ५२५ व ५२६ मध्ये उभा केलेल्या इंडस्ट्रीमध्ये घेतलेला आहे. केवळ गट क्र. ५२६ व्यतिरिक्त अन्य गटाच्या नोंदी नाहीत, यावरुन Unauthorise use ग्राहक करते असे म्हणता येणार नाही. ग्राहकाच्या म्हणण्यानुसार वाढीव वीज मागणी अर्जात दि. १८.०५.२०१० रोजी गट क्र. ५२६ सह गट क्र. ५२५ ची नोंद केली आहे ती वि.प.ने विचारात घेतली नाही. तसेच मा. जिल्हाधिकारी यांच्या दि.०९.०५.२००८ च्या आदेशान्वये सर्व मिळकतींचे एकत्रीकरण (amalgamation) झाले आहे ही महत्वाची कायदेशीर नोंद ग्राह्य मानली जात नाही. सदर मिळकतींचे एकत्रीकरण झाले असून एकच कंपाऊंड वॉल आहे. त्यामुळे कंपाऊंड वॉलचे आतील सर्व मिळकती म्हणजे एकच premises आहे असे अनुमान काढता येईल. Premises ची व्याख्या- Central Govt.Act - The Public Premises (Eviction of Unauthorised Occupants) Act १९७१ Section २ Clause (३) मध्ये -

Premises means any land or any building or part of building and includes -

(i) the garden, grounds and outhouses, if any, appertaining to such building or part of a building and

(ii) any fittings affixed to such building or part of a building for the more beneficial enjoyment thereof

अशीच व्याख्या महाराष्ट्र रेंट कंट्रोल ॲक्ट १९९९ मधील कलम ७.९ मध्ये दिलेली आहे. वि.प.च्या स्थानिक अधिकाऱ्यांनी दि. २६.०४.२०१२ व दि. ०५.०२.२०१३ रोजी ग्राहकाच्या मे. मयुरा स्टील्स प्रा.लि. च्या गट क्र. ५२६ ची तपासणी केली असता असे निरीक्षण केले आहे की,

some machinery can be shifted in between ५२५, ५२६ & ५२८ as and when required by M/s. Mayura Steels

परंतु याचवेळी पूर्वी चारही गट नंबर एकत्रित करुन व एकच कंपाऊंड वॉल यामुळे कंपाऊंड वॉलच्या आतील भागात असलेली factory याचा विचार केलेला दिसत नाही. त्यामुळे अनधिकृत वापर झाला असे मानता येणार नाही. वि.प.च्या अधिकाऱ्यांच्या Self-contained Note नुसार कार्यकारी अभियंता (शहर) कोल्हापूर यांच्या अहवालात अ.क्र. ४ मध्ये -

There are two survey numbers/ Gat numbers - they should correct and write these two numbers in the application and technically load देणे feasible असल्याचे म्हटले आहे. यावरुन ग्राहकाने औद्योगिक कारणासाठी घेतलेला विद्युत पुरवठा निश्चितपणे केवळ गट क्र. ५२६ साठी नसून त्यांच्या मालकीच्या लगतच्या जमिनीसाठी व फॅक्टरीच्या premises साठी घेण्यात आला आहे असे म्हणता येईल. त्यामुळे वि.प.चे अधीक्षक अभियंता यांची त्यानंतरची कारवाई ही निश्चितपणे Section १२६ Sub Section ६ Clause b (V) नुसार गाहकाने मंजूर असलेल्या premises व्यतिरित्र इतरत्र गैरवापर केला असे म्हणता येणार नाही.

वि.प.ने आपल्या जादा म्हणण्यासोबत मा.गुजरात उच्च न्यायालयाचा डे.इंजिनिअर वि. रमेश, केस क्र. १०५९९/२०१० मधील दि. १४.११.२०११ चा आदेश जोडला आहे. त्यामध्ये असेसिंग ऑफीसर यांनी सेक्शन १२० विद्युत कायदा २००३ व महाराष्ट्र शासनाचे Condition of Supply बद्दलचे २००६ च्या परिपत्रकातील कलम २४ ची पूर्तता केली किंवा नाही हे तपासण्याचे अधिकार संबंधित परिपत्रक आणि विद्युत कायद्यातील परिपत्रकानुसार Appellant Authority ला आहेत. त्या कारणावरुन मा. उच्च न्यायालय, गुजरात यांनी मंचाला Jurisdiction नाही असे निरीक्षण करुन मंचाचे आदेश रद्द ठरविले आहेत, त्यामध्ये ग्राहकावर वीज चोरीचा ठपका ठेवून त्याचेवर विद्युत कायदा २००३ कलम १३५ नुसार वीज चोरीचा गुन्हा दाखल झाला आहे. वि.प.चे दि. ०५.०७.२०१३ चे वाणिज्य परिपत्रक क्र. २०० चा ग्राहकाने संदर्भ घेतला आहे. त्यामध्ये असेसिंग ऑफीसरने लॉग बूक ठेवावे व असेसमेंट हे पूर्ण काळासाठी असावी, कालावधी निश्चित करणेत येत नसलेस १२ महिन्याच्या कालावधीसाठी -

१२ months immediately preceding date of inspection असावे. या ठिकाणी Assessment Order मधील तपशील पहाता, १४ महिन्यांची असेसमेंट केली आहे असे प्रथमदर्शनी वाटते. तक्रारीमध्ये नमूद केलेल्या घटना पहाता, ३ वेळेस तपासणी अनुक्रमे दि. २६.०४.२०१२, ०५.०२.२०१३ व दि. १९.०९.२०१३ रोजी झाल्याचे दिसते. Supplementary bill दिले तेव्हा सोबत provisional assessment दिली नव्हती. वि.प.ने वाणिज्य परिपत्रक क्र. ४६ दि. १६.१०.२००६ हे Govt. Notification २६.०९.२००६ च्या अनुषंगाने काढले आहे, त्यानुसार मुख्य अभियंता / अधीक्षक अभियंता यांनी उच्चदाब ग्राहकाचे बाबतीत विद्युत कायदा कलम १२६ खाली असेसिंग ऑफीसर नेमले आहेत त्यानुसार कारवाई झाली कि नाही हे तपासणी क्रमप्राप्त होते. या ठिकाणी Assessment Order वि.प.ने निश्चित मुदतीत ७ दिवसांत दिलेली नाही, दोन वेगवेगळी सप्लीमेंटरी बीले दिली आहेत, बीलासोबत Provisional assessment दिले नाही.

वरील सर्व कारणांवरुन मंचाचे असे मत झाले आहे की, ग्राहकाचा वीज वापर हा निश्चितपणे अनधिकृत नाही. जरी वीज कनेक्शन गट क्र. ५२६ मध्ये असले तरी गट क्र. ५२५, ५२६ साठी फार पूर्वी सन २०१० ला सुधारीत नकाशा वि.प.च्या सूचनेनुसार दिला आहे, तेथे वीज पुरवठा चालू आहे. वाढीव भार मागणी केली असता, field officer कडून तोडपाणी झाली व ही गोष्ट लक्षात आली. त्यापूर्वी मा. जिल्हाधिकारी यांनी सन २००८ मध्ये या चारही गट क्रमांकाची एकत्रित सनद दिली असून ग्राम पंचायत बांधकाम परवाना मंजुरीनुसार ४ गटांचा एक premises केला असून सर्व मिळकती एकाच कंपाऊंड वॉलच्या आत आहेत, या वरुन विद्युत पुरवठा केवळ गट क्र. ५२६ साठीच होता असे म्हणता येणार नाही व इतर गट क्रमांकांना विद्युत पुरवठा होतो म्हणजे 'अनधिकृत ' म्हणता येणार नाही. ग्राहकास अधिनियम १२६ मधील तरतूद लागू होत नसल्यामुळे वि.प.ची दि. १५.१०.२०१३ ची Final Assessement Order नुसार केलेली मागणी रद्दबादल ठरते असे अनुमान मंचास काढता येईल. मुद्दा क्र. २ चे उत्तर ' होय ' असे देण्यात येत आहे.

वरील विवेचनावरुन सदरची तक्रार मंचासमोर चालू शकते व वि.प.ने ग्राहकावर केलेली कारवाई ही निश्चितपणे अनधिकृत वीज वापर होत नाही, त्यामुळे Assessment Order नुसार दि. १५.१०.२०१३ च्या नोटीसीनुसार मागणी केलेली बिलाची रक्कम रद्दबादल करणे कायदेशीर व योग्य होईल असे मंचाचे मत झाले आहे. खालील प्रमाणे आदेश -

## आदेश

१) तक्रार मंजूर करणेत येत आहे.

२) ग्राहकाने मागणी केल्याप्रमाणे दि.१५.१०.१३ ची final assessment order व यासोबतचे final bill रु.४१,७८,५९२/- रद्द करणेत येत आहे.

३) सदर आदेशाची अंमलबजावणी केल्याचे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल ) विनियम २००६ ८.७ नुसार वि.प. यांनी मंचास कळवावे.

४) या निर्णयाविरुध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा. बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स,बांद्रा (पूर्व) मुंबई यांजकडे करता येईल.

सही/-

दिनांक : ( बी.जी. पवार )

अध्यक्ष (ग्रातनिमं)

जी. सी. लेले, सदस्य .. सही/-

जी.बी.पानकर, सदस्य सचिव .. सही/-

एकमताच्या / बहुमताच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यात यावी.

**श्री. जी. बी. पानकर, सदस्य सचिव, ग्राहक तक्रार निवारण मंच, कोल्हापूर केस क्र. १५/१४-१५ - (मे. मयुरा स्टील्स प्रा.लि.) बाबत आपले स्वतंत्र मत देत आहेत.**

सदरील तक्रार ही ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल विनियम २००६ च्या ६.८ (१) च्या तरतुदीनुसार मंचापुढे चालते किंवा नाही ? ही बाब लक्षात घेणे आवश्यक आहे.

मे. मयुरा स्टील्स प्रा.लि. कोल्हापूर यांना विद्युत पुरवठा दि. ६.३.२००६ रोजी नव्याने देण्यात आला. सदरील विद्युत पुरवठा हा त्यांच्या मागणीप्रमाणे गट क्र. ५२६ मौजे टोप, ता. हातकणंगले येथे देणेत आलेला आहे. उप कार्यकारी अभियंता, मार्केट यार्ड उप विभाग, कोल्हापूर यांच्या पहाणीनुसार गट क्र. ५२६ मधील विद्युत पुरवठा हा गट क्र. ५२५, ५२८ व गट क्र. ५२९ विस्तारीत केला म्हणून विद्युत कायदा २००३ कलम १२६ ( ६ ) ब (५) मधील तरतुदीचा भंग केल्याचे प्रथमदर्शनी आढळले.

अधीक्षक अभियंता, कोल्हापूर तथा निर्धारण अधिकारी (Assessing Officer) यांनी प्रत्यक्ष पाहणी करुन सदर ग्राहकाने विद्युत कायदा २००३ कलम १२६, उप कलम (६) मधील ब (५) या तरतुदीचा भंग केल्याचे आढळल्यामुळे कारवाई केलेली असून ग्राहकास रु. ४१,७८,५९२/- चे बील देण्यात आलेले आहे.

1. E.A.2003, Section 126, Sub section 6 reads:-

   a. " Assessing Officer" means an officer of a State Government or Board or Licensee
   as the case may be, designated as such by the State Government.

   b. unauthorized use of electricity" means the usage of electricity –

      i) by any artificial means; or
      ii) by a means not authorized by the concerned person or authority or licensee; or
      iii) through a tampered meter; or
      iv for the purpose other than for which the usage of electricity was authorized; or
      **v) for the premises or areas other than those for which the supply of electricity was authorized.**

१) श्री. कुमठेकर, अधीक्षक अभियंता, कोल्हापूर यांनी तक्रारीवरील लेखी निवेदनात तसेच सुनावणीच्या वेळेस ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल विनियम २००६ कलम ६.८ नुसार मंचाच्या अधिकारक्षेत्राचा मुद्दा उपस्थित केलेला आहे.

**कलम ६.८ - जर मंचाचे सकृतदर्शनी असे मत झाले की, त्याच्याकडे पाठविण्यात आलेली गाऱ्हाणी अधिनियमाच्या खालील कोणत्याही तरतुदींच्या कक्षेत येणारी आहेत तर ती गाऱ्हाणी मंचाच्या अधिकारक्षेत्रातून वगळण्यात येतील -**

**(१) अधिनियमाच्या कलम १२६ मध्ये तरतूद केल्याप्रमाणे विजेचा अनधिकृत वापर,**

**(२) अधिनियमाच्यास कलम १३५ ते १३९ मध्ये तरतूद केलेले अपराध आणि दंड,**

२) ग्राहकाने मंचापुढे सादर केलेली महावितरणची कागदपत्रे (ग्राहकाच्या अपिलातील पान क्र. ४७ Self-contained Note of Executive Engineer, Urban, Kolhapur to S.E. Kolhapur dated 19.03.2010) हे अनधिकृत असून अंतिम निर्णय घेतांना विचारांत घेणे योग्य होणार नाही असे माझे मत आहे.

३) ग्राहक प्रतिनिधी यांनी मे. गॅलक्सी ॲटो ॲक्सल प्रा.लि. कोल्हापूर यांच्या संदर्भात मा. विद्युत लोकपाल, मुंबई यांचे आदेश दि. १.१०.२०१३ ( Representation No. ७१ of २०१३ ) या केसचा आधार घेतला होता. सदर आदेशाविरुध्द अधीक्षक अभियंता, कोल्हापूर यांनी अंतरिम स्थगितीसाठी मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे रिट पिटीशन नं. १३१९ ऑफ २०१४ दाखल केले होते. **मा.उच्च न्यायालय यांनी त्यांच्या दि. ६ ऑगस्ट २०१४ च्या आदेशानुसार अंतरिम स्थगिती दिलेली आहे. ही बाब दुर्लक्षून चालणार नाही.**

**CORAM : R.M. SAVANT, J**
**DATE : 06TH August 2014**

1. The issue in the above Petition is as regards whether the Electricity Ombudsman (Mumbai) could have exercised jurisdiction in respect of the final assessment which has been done under Section 126 of the Electricity Act 2003 when the IGRF and the CGRF have refused to entertain the application filed by the Respondent No. 1 in view of the remedy by way of Appeal under Section 127 of the Electricity Act being available. The Electricity Ombudsman (Mumbai) has chosen to exercise the jurisdiction on the ground that prior to issuance of the final assessment the procedure that is required to be followed has not been followed. In view of the said exercise of jurisdiction against a final assessment, an arguable case is made out. Hence Rule.

2. Considering the nature of the order that has been passed by the Ombudsman (Mumbai) and the directions contained therein as also the further order passed by MERC there would be interim relief in terms of prayer clauses (c) and (b 1).

४) कोल्हापूर मंचाने या पूर्वी याच ग्राहकाने पुरवणी बिलाच्या अंतिम स्थगितीसाठी दाखल केलेला किरकोळ अर्ज क्र. १ - २०१३-१४ मध्ये दि. २८.११.२०१३ रोजी खालील प्रमाणे आदेश पारित केला होता.

**आदेश**

१) ग्राहकाचा दि. २४.१०.२०१३ चा वितरण कंपनी विरुध्दचा अर्ज मंजूर करणेत येत आहे.

२) वितरण कंपनीने दि. १५.१०.२०१३ च्या पत्रानुसार मागणी केलेले फायनल असेसमेंट ऑर्डर नुसार दिलेले फायनल बील रु. ४१,७८,५९२/- ज्याची तारीख १५.३.२०१३ अशी दाखविली आहे त्याच्या मागणीस व वसुलीस अंतरीम स्थगिती (तात्पुरती मनाई) देणेत येत आहे.

३) वितरण कंपनीने या रकमेच्या वसुलीपोटी ग्राहकाचा विद्युत पुरवठा मंचाचे पुढील आदेश होईपर्यंत खंडीत करु नये असे आदेश देणेत येत आहेत.

सदर आदेशाविरुध्द अधीक्षक अभियंता, महावितरण, कोल्हापूर यांनी **मंचाच्या अधिकारक्षेत्राच्या मुद्दयावर अंतरिम स्थगिती करिता मा. उच्च न्यायालय, मुंबई यांचेकडे दि. १७.०१.२०१४ रोजी दावा दाखल केलेला आहे.** (Registration No. WP/2277/2014) सदर दाव्याबाबत अधीक्षक अभियंता, कोल्हापूर यांनी मंचास सुनावणी दरम्यान व वेळोवेळी सद्यस्थिती अवगत केलेली आहे. तो निर्णयासाठी प्रलंबित आहे.

५) विद्युत कायदा २००३ मधील कलम १२६ मधील तरतुदीनुसार ग्राहकावर कारवाई झाल्यास तो कलम १२७ खाली शासनाने निर्देशित केलेल्या अपीलीय अधिकाऱ्याकडे दाद मागू शकतो.

**विद्युत पुरवठादाराने एखादी कलम १२६ अंतर्गत ग्राहकावर केलेली कारवाई योग्य की अयोग्य हे ठरविण्याचे अधिकार मंचास नाहीत असे माझे स्पष्ट मत आहे. प्रथमतः ग्राहकाने त्याबाबत कलम १२७ नुसार शासनाने नेमलेल्या अपीलीय अधिकाऱ्याकडेच दाद मागणे आवश्यक आहे.**

**ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल विनियम २००६ कलम ६.८(१) च्या तरतुदीनुसार सदर तक्रार मंचाचे अधिकारक्षेत्रात येत नाही असे माझे स्पष्ट मत आहे. त्यामुळे सदरील तक्रार मंचाने फेटाळणे योग्य होईल.**

सही/-

**दिनांक : २२.११.२०१४**

**( जी. बी. पानकर )**

**सदस्य सचिव ग्राहक तक्रार निवारण मंच कोल्हापूर**

# परिशिष्ट १ तक्रार क्र.१५/१४-१५ वरील आदेश

**मे.मयुरा स्टीलस् प्रा.लि., शिये बावडा रोड,एम.आय.डी.सी.,**
**शिरोली, जि.कोल्हापूर.**

प्रस्तुत तक्रारीची सुनावणी मंचासमोर घेण्यात आली. वितरण कंपनीची मंचास अधिकार नाही ही हरकत मंचाकडून फेटाळण्यात आली आहे. सदर तक्रार मंचासमोर चालते असे निरीक्षण नोंदविण्यात आले आहे. वितरण कंपनीस तक्रारीबद्दल अधिक म्हणणे मांडण्यास संधी देण्यात येत आहे. वितरण कंपनीने जादा लेखी अहवाल ( Additional Say ) ग्राहकास एक प्रत देऊन मंचास दि.६.९.२०१४ पर्यंत दाखल करावा. ग्राहकास त्या म्हणण्यास प्रत्युतर (relejoinda) देण्यास मुभा देण्यात येत आहे. त्यानंतर तक्रारीची पुढील सुनावणी घेण्यात येईल.

| | | |
|---|---|---|
| सही/- | सही/- | सही/- |
| (जी.बी.पानकर) | (जी.सी.लेले) | (बी.जी.पवार) |
| सदस्य सचिव | ग्राहक सदस्य | अध्यक्ष |